# प्रकरण दुसरे

## लोकमान्य टिळकांची राजकीय विचारसरणी

## प्रकरण दुसरे

## लोकमान्य टिळकांची राजकीय विचारसरणी

"स्वराज्याचा मंत्र" लोकमान्य टिळकांनी भारतीय जनतेला दिला. त्यांनी ब्रिटिश सत्तेला उघड-उघड विरोध केला. लोकमान्यांचे मुख्य ध्येय "स्वराज" संपादन करण्याचे असल्यामुळे इंग्राजी सत्तेविरूद्ध जनतेमध्ये असंतोष भडकवण्याच्या कार्यावर त्यांनी अधिक भर दिला. मवाळांच्या तेजशून्य राजकीय विचारातून राष्ट्रीय चळवळ बाहेर काढली. असे करत असताना भारतीय लोकजीवनामध्ये रूजलेल्या धार्मिक, सांस्कृतिक विचारांशी सुसंगत असे नवीन पाश्चिमात्य विचार त्यानी स्वीकारले.

लोकमान्य टिळकांच्या राजकीय विचारांची मीमांसा करताना स्वराज्य, स्वातंत्र्य आंदोलनाची चतु:सुत्री, राष्ट्रवाद इत्यादी विषयां-बाबतचे त्यांचे विचार पाहणे महत्वाचे ठरते. १८८० ते १९२० या आपल्या चाळीस वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यामध्ये टिळकांनी अनेकविध कार्य केले. टिळकांनी भारतीय जनतेला भारतीय स्वातंत्र्याची आणि त्यांच्यावरील अन्यायाची जाणीव करून दिली. स्वातंत्र्य प्राप्तीशिवाय "सुराज्य" निर्माण होणार नाही, अशी त्यांची खात्री होती. म्हणूनच "सामाजिक सुधारणासाठी राजकीय स्वातंत्र्याची प्राप्ती लांबणीवर टाकणे शहाणा-पणाचे नाही", असे त्यांना वाटत होते. सामाजिक सुधारणा ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून सामाजिक सुधारणा विशिष्ट कालावधीमध्ये पूर्ण करणे अशक्य आहे." [१] राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न एकदा सुटला की सामाजिक, आर्थिक, धार्मिक प्रश्न आपोआपच सुटतील. ब्रिटिश लोकांच्या साम्राज्यशाहीत आपल्या देशाची सामाजिक प्रगती होणे

कठीण आहे. त्यासाठी राजकीय स्वातंत्र्याचा आग्रह धरणे हे सर्व भारतीयांचे कर्तव्य आहे. असे त्यांचे स्पष्ट मत होते.

"द लाईफ अँड फिलॉसॉफी ऑफ लोकमान्य टिळक" या ग्रंथामध्ये डॉ. विश्वनाथ प्रसाद वर्मा या लेखकांनी म्हटले आहे की, टिळकांनी प्लेटो , अॅरिस्टॉटल, सिसरो यांच्याप्रमाणे समाजासाठी राजकीय विचार दिले नाही. मात्र टिळकांच्या राष्ट्रवादाच्या विचारसरणीवर पाश्चिमात्य राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि आत्मनिर्भयतेचा प्रभाव होता. [२] तत्वज्ञान, वेदांग, ज्योतिष, प्राच्यविद्या, गणित आणि कायदा या विषयात टिळकांचा अभ्यास होता. व्यक्तिगत जीवनामध्ये टिळक हे हिंदूधर्माचे आणि संस्कृतीचे उपासक होते. भारतीय प्राचीन ग्रंथाचा, त्यांच्या विचारसरणीवर फार मोठा प्रभाव होता. वेद आणि गीतेमध्ये सांगितलेले आत्मिक स्वातंत्र्य त्यांना राजकीय स्वातंत्र्याबरोबर अभिप्रेत होते. भारतातील प्राचीन संस्कृतीचा वापर करून त्यांना बदल घडवून आणायचा होता. "टिळकांना जुन्या गोष्टी वगळून भरीव कार्य करणे मान्य नव्हते."

## लो. टिळकांच्या आंदोलनाची चतु:सुत्री

लो. टिळकांच्या राजकीय कार्याचा आढावा घेतांना साधनाच्या संबंधी त्यांची काय भूमिका होती हे पाहणे उद्बोधक ठरेल. "स्वराज्य" हे लोकमान्य टिळकांचे साध्य होते व "साधनानाच अनेकता" हे त्यांच्या कार्यपध्दतीचे सुत्र होते. टिळकांच्या काळात देशाची राजकीय प्रगती व्हावी यासाठी सनदशीर मार्गाने कार्य करावे असे ना. गोखले, दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, सार्वजनिक काका, अरविंद घोष व त्यांचे सहकारी,

स्वा. सावरकर इत्यादी क्रांतीकारक नेत्यांना स्वातंत्र्यासाठी क्रांतीचा, आत्मबलिदानाचा मार्ग पसंद होता. परंतु लोकमान्य टिळकांना हे दोन्हीही मार्ग मान्य नव्हते. त्यांचा मार्ग भिन्न होता. सर्वसामान्य माणसाला चळवळीमध्ये सहभागी करून घेता येईल असे कार्यक्रम आखून स्वराज्याच्या चळवळीला व्यापक अधिष्ठान दिले पाहिजे, असे त्यांच्या कार्यपध्दतीचे सूत्र होते. निव्वळ क्रांतीचा मार्गही स्वीकारणे किंवा नेमस्तवादी धोरण स्वीकारणे योग्य नव्हते. म्हणून टिळकांनी दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षीय भाषणातील सुत्र पुढे चालवून स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतु:सुत्रीचा मार्ग स्वीकारला.

लोकमान्य हे सुध्दा बंडखोर क्रांतीकारक स्वभावाचे होते. परंतु कायद्याच्या चौकटीत राहून बंडखोरीचा कार्यक्रम दिला तरच सर्वसामान्य त्यात सामील होतील असा त्यांचा वास्तववादी दृष्टीकोन होता. वंगभंगाच्या चळवळीचा जहालपणा टिकवून स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य, व राष्ट्रीय शिक्षण या विधायक मार्गाने स्वराज्य मागणीचे जनआंदोलन देशभर घडवून आणण्याचे कार्य टिळकांनी केलेले आहे. लो. टिळकांनी हा स्वावलंबनाचा व प्रतिकाराचा मार्ग स्वीकारून स्वातंत्र्याची मागणी केलेली दिसते. "टिळकांच्या मते, राजकीय, धार्मिक, औद्योगिक व सामाजिक असे चार प्रकारचे पारतंत्र्य असते. या सर्व प्रकारच्या पारतंत्र्याशी मुकाबला करण्यासाठी स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चार साधनांचा टिळकांनी पुरस्कार केला आहे." [३]

## स्वराज्य

१९०६ साली कलकत्ता येथे भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनामध्ये 'स्वराज्य' या संकल्पनेचा महर्षी दादाभाई नौरोजी यांनी पहिला उच्चार

केला. [४] त्यानंतर काँग्रेसने आपली मागणी स्पष्ट शब्दात मांडली. ब्रिटिश राज्यव्यवस्था बदलून त्याऐवजी ब्रिटिश अंमलाखालीच पण लोकप्रतिनिधींचा नोकरशाहीवर दाब असलेली राज्यव्यवस्था काँग्रेसला हवी होती. त्याचे स्पष्टीकरण टिळकांनी अनेकदा केले होते. लोकमान्यांनी स्वराज्याचा "प्रजासत्ताक राज्य" हा अर्थ लोकांच्या मनावर बिंबविला, यातच त्यांची राजकीय दूरदृष्टी दिसून येते. हिंदू धर्मात प्रत्येकाला आत्मा आहे हे जे सांगितलेले आहे, याचाच अर्थ, प्रत्येकाला चांगले-वाईट यातील फरक समजण्याचे सामर्थ्य आहे आणि समाजाची ही सद्विवेकबुध्दी जागृत राहिल्यास कोणत्याही चळवळीस अनिष्ट वळण लागणार नाही, असे त्यांना वाटत होते.

शिवाजी महाराजांची कल्पना टिळकांनी स्वीकारून राष्ट्रवादाचे पुनरुज्जीवन केले. स्वराज्यासाठी शिवाजी महाराजांनी मुस्लिमांबरोबर लढा दिलेला होता. टिळकांवर शिवाजी महाराज आणि नाना फडणवीस यांचा फार मोठा प्रभाव होता. शिवाजी महाराजांना ते विभुती मानत असत. विभुती म्हणजे दैवी शक्ती असलेली व्यक्ती होय. शिवाजी महाराजांची रायगड येथे असलेली समाधी जतन करण्याच्या दृष्टीने सर रिचर्ड टेंपल यांनी कुलाब्याच्या जिल्हाधिकाऱ्याला पत्र लिहिले. १८८३ मध्ये जेम्स डग्लसने मुंबई सरकार शिवाजी महाराजांच्या समाधीचे जतन करणार आहे किंवा नाही असा प्रश्न उपस्थित केला. १८८५ साली न्या. रानडे यांनी पुढाकार घेऊन, पुण्यात सभा घेऊन शिवजयंतीचा उत्सव साजरा करण्यासाठी निधी गोळा करावा असे सुचविले. १८८५ ते १८९५ या दहा वर्षांच्या काळात कोणत्याही नेत्याने या प्रश्नाकडे लक्ष दिले नाही. ३० मे, १८९५ ला पुण्यात औंधकर पंतप्रतिनिधींच्या अध्यक्षतेखाली पुण्यात सभा घेण्यात आली. एका अलौकिक पुरुषाच्या स्मरणार्थ ही सभा आहे,

असे या सभेमागची भूमिका सांगताना टिळकांनी स्पष्ट केले. त्यानंतर वर्षभर वर्गणी जमवून १५ एप्रिल, १८९६ रोजी रायगडावर शिवाजी उत्सव साजरा करण्यात आला. १५ एप्रिल, १९९६ ला या घटनेला शंभर वर्षे पूर्ण होतील. शिवजयंतीचा उत्सव हा महाराष्ट्रीय झाला म्हणजे त्यास राष्ट्रीयत्वाचे स्वरूप प्राप्त होण्यास अडचण होणार नाही, असे टिळकांना वाटत असे. कलकत्त्यामध्ये मोतीलाल घोष, बिपीनचंद्र पाल यांच्या पाठिंब्याने आणि सखाराम गणेश देशकर यांच्या पुढाकाराने शिवाजी उत्सव साजरा करण्यात आला.

टिळकांनी शिवाजी महाराजांच्या 'स्वराज्य' या संकल्पनेपासून राजकीय प्रेरणा घेतली. स्वावलंबनावर त्यांच्या आर्थिक धोरणांचा भर होता आणि "समाजसुधारणा ही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे" अशी त्यांची धारणा होती. 'अध्यात्मिक राष्ट्रवादाचे टिळक' या आपल्या लेखात व्ही.पी. वर्मा यांनी 'स्वराज्य' या शब्दाचा उगम सांगितला. 'सवर्त' किंवा 'स्वराज्य' हा शब्द वैदिक शब्द असून, वैदिक वाङ्मयात सापडतो. या शब्दाला राजकीय अर्थ असून त्याचा अर्थ स्वातंत्र्य किंवा शासन करणे होय. उपनिषदामध्ये ही संकल्पना अध्यात्माच्या दृष्टिकोनातून असलेली दिसते. "ज्या व्यक्तींना आध्यात्मिक प्राप्ती असेल अशा व्यक्तींना स्वराज्य असलेच पाहिजे हे गृहित धरलेले आहे."[५]

गांधीजीप्रमाणे टिळकांनी देखील स्वराज्याला आत्मिक अर्थ दिला. ते स्वराज्याला आत्मा मानत होते. 'स्वराज्य' हा केवळ हक्क नसून तो धर्म आणि कर्मयोगाचा एक भाग आहे असे त्यांचे मत होते. फलाची अपेक्षा न ठेवता माणसाने या जगातील आपले कर्तव्य अखेरपर्यंत करीत राहावे,

त्यापासून कधीही विन्मुख होऊ नये म्हणजे कर्मयोग, अशी कर्मयोगाची सर्वसाधारणपणे व्याख्या केली जाते.

मंडालेच्या तुरुंगामध्ये असतांना टिळकांनी "गीतारहस्य" हा ग्रंथ लिहिला. ग्रंथरूपाने जून, १९१५ ला "गीतारहस्य" प्रकाशित करण्यात आला. टिळकांचे धर्मविषयक आणि नीतीविषयक विचार या ग्रंथामध्ये व्यक्त झालेले आहे. या ग्रंथामध्ये गीतेवर भाष्य करण्यात आलेले असून, गीता हा ग्रंथ कर्मनिष्ठेचे तत्त्वज्ञान सांगणारा आहे, असे टिळकांचे मत होते. मोक्षासाठी आवश्यक ज्ञान प्राप्त झाल्यावर, कर्माला कोणतेही स्थान नाही अशी हिंदू समाजातील कर्मत्यागपर दृष्टी टिळकांना मान्य नव्हती. भारतामध्ये निवृत्तीकडे जाणा-या वर्गाला थांबवून त्यांची कर्मप्रवृत्ती वाढवण्यासाठी टिळकांनी धर्मविचार केलेला आहे. यातूनच स्वराज्य हा धर्म आहे; कर्म आहे अशी मांडणी टिळकांनी केलेली आहे.

टिळकांनी स्वराज्याची चळवळ देशभर व्यापक करत असतांना "स्वराज्य" म्हणजे काय ? हे जनतेला वेळोवेळी समजून सांगितले. समग्र टिळक या ग्रंथाच्या सहाव्या खंडामध्ये "स्वराज्य म्हणजे लोकांनी त्यांच्या इच्छेनुसार केलेले स्वत:चे राज्य (स्व-राज्य) होय." [६] असे स्पष्ट करण्यात आलेले आहे. मात्र ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य ही संकल्पना टिळकांची होती. स्वराज्य आणि स्वातंत्र्य यात टिळकांनी भेद केला. त्यांच्या मते, "स्वातंत्र्य" म्हणजे ब्रिटिशांशी असलेले संबंध पूर्णत: तोडून टाकणे तर "स्वराज्य" म्हणजे या साम्राज्याच्या अंतर्गत वसाहतिक स्वातंत्र्य उपभोगणे होय. स्वातंत्र्याची मागणी करणे म्हणजे राजद्रोह ठरणार होता, मात्र स्वराज्याची मागणी करता येणे शक्य होते. इंग्रजाचे राज्य कायद्याचे आहे व कायद्यानेच त्यांच्याशी भांडले पाहिजे, असे टिळक

वारंवार म्हणत असते. कायदेशीर भांडणाचा फायदा हा कसा होतो हे सांगताना टिळक लिहितात, "कायदेशीर रीतीने सरकारशी भांडावयास रयतेस कसे शिकवावे ही विद्या आमच्या पुढारी लोकांस शिकावयाची आहे व ती जेव्हा ते शिकतील तेव्हाच सरकारी अधिका-यांचा उर्मटपणा उतरेल व रयतेस काही फायदा होईल." ७ एक वास्तववादी राजकारणी या नात्याने टिळकांनी नेहमी स्वराज्याची मागणी केली. स्वराज्य म्हणजे "होमरूल". ब्रिटिश साम्राज्यातच राहून देशी प्रतिनिधींच्या हाती पूर्ण कारभार, असे "वसाहतिक स्वातंत्र्य" त्यांना अभिप्रेत होते. स्वराज्याचा हा अर्थ सरकारने मानला तर नोकरशाहीचे वर्चस्व आपोआपच कमी झाले असते. टिळकांनी अनेक भाषणात व लेखात नोकरशाहीविषयी कडक टीका केली होती. नोकरशाहीवर टिळक नेहमीच हल्ला चढवत असत. "ब्युरॉक्रसी" या शब्दाला नोकरशाही हा मराठी प्रतिशब्द कसा आला हे पहाणे आवश्यक ठरते.

होमरूल लीगच्यावतीने विलायतेला टिळक, न. चि. केळकर, बिपिनचंद्र पाल, दादासाहेब करंदीकर, खापर्डे यांचे शिष्टमंडळ जाणार होते. या दौ-यासाठी निधी जमवण्यासाठी टिळक व-हाड-मध्य प्रांतात दौरा केला. अकोट येथे बोलताना मनमानी कारभार करणा-या ब्युरॉक्रसीवर टिळकांनी हल्ला चढवला. बोलण्याच्या ओघात त्यांना "नोकरशाही" हा मराठी प्रतिशब्द सुचला आणि त्यांनी तो वापरला. लोकमान्यांनी "स्वराज्य" व "सुराज्य" या नावाने केसरीत १९०७ साली एक अग्रलेख लिहून स्वराज्याची कल्पना जनतेपुढे मांडली. टिळकांच्या मते, स्वराज्याचे अर्थ दोन आहेत. एक "सुव्यवस्थित राज्य" आणि दुसरा "सुखकारक राज्य" होय. सुराज्यामध्ये कायद्याने चालविलेले राज्य अभिप्रेत आहे. टिळकांची "स्वराज्याची" संकल्पना लोकशाहीवर आधारलेली, संघराज्यात्मक होती. त्यामध्ये पार्लमेन्ट,

प्रांतिक स्वायतत्ता, ग्रामसंस्था इत्यादी सूचना होत्या. केंद्र सरकार जरी साम्राज्य सरकारच्या आदेशानुसार चालले तरी प्रांतिक राज्यकारभार लोकमताला प्राधान्य देऊन चालविण्यात आला पाहिजे. प्रांतिक सरकारच्या हाती पूर्ण सत्ता देऊन सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. ग्रामसंस्थेचे पुनरुज्जीवन जर करायचे असेल तर राज्यघटनेच्या कायद्याप्रमाणे प्रांतिक सरकारला जो अधिकार आहे तो लोकांच्या हाती असला पाहिजे. असे टिळकांचे मत होते. प्रांतिक सरकारचा अधिकार लोकांच्या हाती आला म्हणजे काय बदल होतील. याची मीमांसा करताना टिळक म्हणतात, "प्रांतिक सरकारचे अधिकार एकदा लोकांच्या हातात आले म्हणजे मग ग्रामसंस्थाच काय, पण तालुका अगर जिल्हासंस्थाही निर्माण करण्यास लोकांस पूर्ण अधिकार येईल." ८

१९१६ साली टिळकांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून त्यांनी स्वराज्याची संकल्पना मांडली. १९०५ ते १९०७ आणि १९१६ ते १९२० या कालावधीमध्ये टिळकांची भूमिका ही संघटकाची होती. कॉंग्रेस ही मध्यमवर्गासाठी होती ती सर्वसामान्य लोकांपर्यंत नेण्याचे कार्य त्यांनी केले. सुरत कॉंग्रेसनंतर टिळकांनी स्वराज्याच्या संकल्पनेसंबंधी हिंदी जनतेत कोणते मतप्रवाह आहेत आणि त्यांची स्वराज्यविषयक धारणा काय आहे याचा ऊहापोह 'राजकीय पक्षोपपक्ष' या लेखमालेत केलेला आहे. स्वराज्याबाबत पाच मतप्रवाह असल्याचे टिळकांनी म्हटले आहे ते खालीलप्रमाणे -

१) राजकीय चळवळीत न पडता इंग्रज राज्यकर्ते जे देतील ते घावे.

२) राजकीय सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न न करता राजकीय राज्यकर्त्यांच्या उणिवा नजरेस आणून देणे.

३) राज्यकर्त्यांची प्रार्थना हे साधन ठेवून स्वराज्याखेरीज राज्यपद्धतीतील दोष सुधारण्याचा उपाय नाही असे मानणारा प्रवाह.

४) आपल्या मेहनतीने राज्यकर्त्यांना अडवून स्वराज्य मिळवले पाहिजे. स्वराज्य हे स्वातंत्र्याचे पहिले रूप आहे असे मानणारा प्रवाह.

५) पूर्ण स्वातंत्र्य मिळवून हिंदुस्थानातील लोकांनी आपली राजकीय प्रगती करावी असा मानणारा प्रवाह.

वरील विविध मतप्रवाह पाहिल्यानंतर लक्षात येते की, टिळकांना पूर्ण स्वातंत्र्य अभिप्रेत नसून ब्रिटिश राज्यांतर्गतच देशी प्रतिनिधींच्या हाती पूर्ण कारभार पाहिजे होता. असे स्वराज्य हे कायद्याच्या कक्षेतच मिळवण्यावर त्यांचा भर होता.

१९१६ च्या काँग्रेसच्या अधिवेशनासाठी टिळक लखनौला गेले. २५ ते ३१ डिसेंबर पर्यंत टिळक लखनौला होते. लखनौच्या अधिवेशनामध्ये होमरूल, स्वराज्य आणि सेल्फ गव्हर्नमेंन्ट ही एकाच मागणीची तीन नावे असून या मागणीसाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे यावर आपल्या भाषणात त्यांनी भर दिला. ३० डिसेंबरला स्वराज्य संघाची सभा झाली. सभेच्या अध्यक्षा अॅनी बेझंट यांच्या विनंतीवरून टिळकांनी भाषण केले. या भाषणामध्ये त्यांनी "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच" हे वाक्य त्यांच्या तोंडून बाहेर पडले." [१] पुढील स्वराज्याच्या चळवळीतील हे घोषवाक्य झाले.

होमरूलसाठी त्यांनी ठिकठिकाणी दौरे केले. टिळकांनी सुरू केलेल्या होमरूल चळवळीची पार्श्वभूमी पाहणे प्रस्तुत ठरेल. होमरूल चळवळीचे बीजे ही

आर्यलंडमध्ये पेरली गेली. तिथून ह्या चळवळीचा प्रचार भारतात कसा झाला हे "लोकमान्य" या ग्रंथामध्ये श्री. नरहर फाटक यांनी स्पष्ट केले आहे. ते लिहितात, १८८० च्या आधी होमरूलची मागणी आर्यलंडने सुरू केल्यानंतर बंगालच्या एक-दोन वृत्तपत्रांनी हिंदुस्थानसाठी देखील होमरूल पाहिजे असा दृष्टिकोन स्वीकारला. १९१३ मध्ये युरोपमध्ये महायुध्द सुरू झाल्यावर ही मागणी मागे पडली. मात्र आर्यलंडने केलेली मागणी ब्रिटिशांना गैर वाटत नाही हे पाहून होमरूलचा प्रसार लोकांमध्ये करण्याचा विचार हिंदी पुढा-यांना पटला व त्याचा उच्चार अनेक मवाळ पुढा-यांनाही महायुध्द पेटल्यावर ठिक-ठिकाणी केल्याचे दाखले तत्कालीन चळवळीच्या इतिहासात आहेत. पहिल्या महायुध्दामध्ये हिंदुस्थानने जी इंग्लंडला मदत केली त्याचा परिणाम म्हणून देशाच्या राज्यकारभारात काही सुधारणा करण्याचे ब्रिटिशांनी ठरविले. या बदलत्या अनुकुल परिस्थितीमध्येच टिळकांनी पुण्याच्या परिषदेमध्ये बॅप्टिस्टांच्या अध्यक्षतेखाली होमरूलची चळवळ सुरू केली. स्वराज्याची मागणी करणे, तिला जनपाठिंबा मिळवणे हा होमरूल चळवळीचा मुख्य हेतू होता. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली १९१६ च्या एप्रिल महिण्यात बेळगावला मुंबई प्रांतिक परिषदेचे अधिवेशन झाले. २८ एप्रिलच्या झालेल्या बैठकीत "स्वराज्य संघ" (होमरूल लीग) स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

"होमरूल लीगच्या संघटनेचे अध्यक्ष म्हणून बॅप्टिस्टांची आणि चिटणीस म्हणून केळकरांची व दुय्यम चिटणीस म्हणून दा. वि. गोखल्यांची निवड करण्यात आली. प्रांतिक परिषद व स्वराज्य संघ याचा अर्थाअर्थी कोणताही संबंध नाही असे जाहीर करण्यात आहे." [१०] प्रांतिक परिषदेचे अधिवेशन संपल्यावर परिषदेच्या हजारो श्रोत्यांसमोर आणि प्रतिनिधीसमोर स्वराज्य या विषयावर टिळकांचे भाषण झाले. या भाषणामध्ये त्यांनी

नोकरशाही हे ब्रिटिश साम्राज्यांचे व्यक्त रूप बदलण्याची आपली मागणी असल्याचे त्यांनी श्रोत्यांना समजावून सांगितले. अशी मागणी करणे म्हणजे राजद्रोह करणे असा अर्थ होत नाही. राज्यकारभार चालवण्यासाठी आम्ही मुळीच अपात्र नाही असेही त्यांनी सांगितले. स्वराज्याच्या मागणीसाठी टिळकांनी ठिकठिकाणी दौरा केला. ॲनी बेझांटयांनी सप्टेंबर, १९१६ ला ऑल इंडिया होमरूल लीगची स्थापना केली. टिळकांशी त्यांची युती होती. कर्नाटक, महाराष्ट्र, मध्यप्रांत-व-हाड हे टिळकांचे कार्यक्षेत्र होते तर ॲनी बेझांट यांनी बिहार, सिंध, गुजरात, मद्रास या भागात आपले कार्य केंद्रित केले. दोन्हीही होमरूल लीगने प्रचार जोरात सुरु केला.

१७ मे, १९१७ रोजी नाशिकला श्रीनिवासशास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या मुंबई प्रांतिक परिषदेमध्ये टिळकांनी स्वराज्याच्या ठरावावर भाषण दिले. त्यात त्यांनी, आपल्या घरचा कारभार आपणच पाहणे म्हणजेच स्वराज्य अशी स्वराज्याची सोपी व्याख्या केली. आपले नैसर्गिक जन्मसिध्द हक्क मागण्यासाठी आपण भिण्याचे कारण नाही, याच भाषणात त्यांनी स्वराज्याच्या कल्पनेला लोकांचे भावनात्मक बळही हवे हा मुद्दा स्पष्ट केला. स्वातंत्र्य हा आत्मा असून आत्मा हा कधीही नाश पावत नाही, स्वातंत्र्य कधीही वृध्द होत नाही अशी मांडणी त्यांनी केली. आत्म्याचे अमरत्व व त्याचा सर्वव्यापीपणा या वेदान्तातून आलेल्या दोन कल्पना टिळक राजकीय क्षेत्रात वापरत होते. इंग्रजापासून स्वराज्याचे हक्क मिळवण्याच्या दृष्टीने या परिभाषेला महत्व होते. देशामध्ये स्वराज्याचे अनुकूल वातावरण तयार करून लोकांना बरोबर घेऊन जाणे महत्वाचे होते. यासाठी त्यांनी दिलेली भाषणे म्हणजे लोकशाहीतील राजकीय शिक्षण होते. "स्वराज्य" हा मुद्दा समाजातील वेगवेगळ्या स्तरावरील लोकांना समजेल अशा भाषेत टिळकांनी मांडले. लोकमताचे संघटित रूप

तयार करून "स्वराज्य आम्ही मिळवणारच" हे दाखविणे आवश्यक होते. त्यासाठी त्यांनी काँग्रेसच्या व्यासपीठाचा आणि स्वराज्यसंघाचा वापर त्यांनी जनमत तयार करण्यासाठी केला.

होमरूल चळवळीच्या प्रचारमोहिमेला पायबंद घालावा यासाठी सरकारने वृत्तपत्रविषयीचा १९१० चा कायद्याचा बडगा उभारला. हा कायदा मंजूर करून घेत असतांना सरकारने हिंसक कृत्यांना उत्तेजन देणाऱ्या किंवा त्यांचे समर्थन करणाऱ्या वृत्तपत्राविरूद्ध हा कायदा वापरला जाईल असे आश्वासन दिलेले होते. मात्र प्रत्यक्षात सनदशीर राजकीय चळवळीचा पुरस्कार करणाऱ्या वृत्तपत्रांविरूद्ध हा कायदा राबवून वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करण्याचे धोरण सरकारने स्वीकारले. वृतपत्र सुरू करतांना वृत्तपत्रांकडून जामिनकीची जास्त रक्कम मागून नंतर कोणत्याही कारणासाठी जामिनकी जप्त करून पुन्हा नव्याने जामिनकी मागायची असे धोरण ठेवण्यात आले. स्वराज्याच्या चळवळीचा पुरस्कार वृत्तपत्रांनी केल्यास त्याचे परिणाम भोगावे लागतील हा उद्देश यामागे होता. वृत्तपत्रे ही माध्यमे प्रसाराचे कार्य करतात त्या कार्यालाच पायबंद बसावा यासाठी सरकारने प्रयत्न केले, त्यापैकी १९१० चा वृत्तपत्रीय कायदा हा होय. स्वराज्याचे आंदोलन टिळकांना तीव्र आणि व्यापक करता येऊ नये यासाठी बेळगाव, आणि अहमदनगर येथे डिसेंबर, १९१६ मध्ये टिळकांनी जी भाषणे दिली ती राजद्रोहात्मक आहेत अशी तक्रार पुण्यात हॅच या जिल्हा दंडाधिकाऱ्यापुढे गायडर या पोलिस अधिकाऱ्याने दाखल केली. हॅचसमोर या खटल्याची सुनावणी झाली. टिळकांच्या बाजूने बॅ. जिना, दादासाहेब करंदीकर, काका पाटील इत्यादी कायदेपंडित होते. उभयपक्षाच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकून, टिळकांचा रोख केवळ नोकरशाहीवर नसून सर्वच राज्यपद्धतीवर आहे असा हॅचसाहेबानी निर्णय दिला. या निर्णयावर मुंबई उच्च न्यायालयामध्ये टिळकांनी दाद मागितली.

२३ ऑगस्ट, १९१६ रोजी टिळकांचे अपील न्यायमूर्ती बीमन व हीटन यांनी दाखल करुन घेतले. १ नोव्हेंबरला टिळकांच्या अपिलावर न्यायमुर्ती बॅचलर व शाहा यांच्या खंडपीठाने निकाल दिला. टिळकांनी प्रजेला अधिकाधिक राजकीय अधिकार द्यावेत अशी मागणी केली म्हणजे ती राजद्रोह ठरत नाही. टिळकांच्या भाषणांचा समग्र विचार केला तर त्यांनी बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करावा असे कोठेही सुचवले नसल्याचे आढळले. "स्वराज्य" हा शब्द उच्चारणे किंवा स्वराज्याची मागणी करणे आक्षेपार्ह ठरत नाही, असे या निकालात नि:संदिग्धपणे म्हटले गेले. मुंबई हायकोर्टाने टिळकांना निर्दोष ठरवले होते. पर्यायाने स्वराज्याची मागणी करणाऱ्यांचा विजय झाला होता. टिळकांनी, "टिळक सुटले, पुढे काय ?" हा अग्रलेख लिहिला त्या अग्रलेखामध्ये न्यायमूर्तींनी नोकरशाहीवर जे ताशेरे मारले होते व जो निर्णय दिला होता, त्याचा कायद्याच्या दृष्टीने निष्कर्ष कोणता आहे व लोकांनी आता काय केले पाहिजे हे स्पष्ट करुन सांगितले. टिळकांनी स्पष्ट केले, की, "स्वराज्याची मागणी कायदेशीर ठरली असून ती मागणी केली तरी तो राजद्रोह होत नाही, असा न्यायालयाचा निकाल सांगतो. म्हणून नोकरशाहीची स्वराज्यातील अडचण आता दूर झाली आहे. तेव्हा लोकांनी नेटाने कामाला लागावे." [११]

१८ जुलै, १९१७ रोजी मॉंटेग्यु-यांची भारतमंत्री म्हणून नेमणूक करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. मॉंटेग्यू हिंदुस्थानात १० नोव्हेंबर, १९१७ ते २४ एप्रिल, १९१८ या कालावधीमध्ये होते. मॉंटेग्यु यांच्यामुळे हिंदुस्थानच्या जाहीरनाम्याच्या मसुद्याला अंतिम रुप देण्याच्या प्रक्रियेला चालना मिळाली, २० ऑगस्ट १९१७ रोजी हाऊस ऑफ कॉमन्समध्ये मॉंटेग्युने

घोषणा केली. ब्रिटिश साम्राज्याचा अविभाज्य भाग असलेल्या हिंदुस्थानला हप्त्याहप्त्याने जबाबदार सरकार देण्याचे उद्दिष्ट राहील हे स्पष्ट केले. त्यासाठी प्रशासनाच्या प्रत्येक शाखेत भारतीयांचे साहचर्य वाढवण्याची गरज असल्याचे प्रतिपादन करण्यात आले. हा अहवाल मिळाल्यावर टिळकांनी लागोपाठ तीन अग्रलेख या अहवालावर लिहिले. या निमित्ताने मुंबईला विशेष अधिवेशन घेण्यात आले. या अधिवेशनामध्ये ब्रिटनच्या संसदेने ताबडतोब कायदा करून निश्चित कालमर्यादा घालून घेऊन त्या अवधीत मॉंटेग्युच्या ऑगस्ट घोषणेतील "जबाबदार सरकारची निर्मिती करण्यासाठी तरतुदी कराव्यात", असा ठराव करण्यात आला.

यानंतर टिळक चिरोल खटल्यासाठी इंग्लंडला गेले. इंग्लंडला गेल्यावर खटल्याच्या पूर्वतयारीसाठी नोव्हेंबर, डिसेंबर, (१९१८) व जानेवारी (१९१९) असे तीन महिने गेल्यावर जानेवारीच्या २९ तारखेला खटला सुरु झाला. सर जॉन सायमन हे टिळकांच्या बाजूने तर सर एडवर्ड कार्सन यांनी चिरोलच्या बाजूने खटला चालवला. २९, ३० व ३१ जानेवारी आणि २१ ते १९ फेब्रुवारी याप्रमाणे एकूण अकरा दिवस खटला चालू होता. या खटल्यामध्ये टिळक विजयी झाले नाहीत. खटल्याच्या निकालानंतर टिळक लंडनला सात-आठ महिने राहिले. या आपल्या वास्तव्यात त्यांनी तेथील मजूर पक्षाची सहानुभूती हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या चळवळीला मिळावी यासाठी प्रयत्न केले. पहिल्या महायुध्दानंतरचा हा काळ होता. त्यामुळे टिळकांना त्यांच्या मदतीची आशा वाटत होती. स्वराज्याच्या चळवळीत ब्रिटिश मजूर पक्षाची मदत मिळेल, परंतु हिंदी लोकांनी आपली चळवळ थंड होऊ देता कामा नये असे सांगताना टिळक म्हणाले होते, "ब्रिटिश मुत्सदी तुमच्या पदरात काही तरी टाकून आजची वेळ निभावून नेण्याच्या विचारात आहे, यावेळी जे काही मिळेल ते तर हयाच पण पुन्हा बाकीचे राहिलेले मिळवण्या-

साठी निश्चयाने झटा." २७ नोव्हेंबर, १९१९ ला टिळक भारतात परत आले. २० एप्रिल, १९२० साली टिळकांनी "कॉंग्रेस डेमॉक्रटिक पक्षाची" स्थापना केली या जाहिरनाम्यातही त्यांनी "स्वराज्याची" संकल्पना मांडलेली दिसते.

## स्वदेशी

लॉर्ड कर्झन यांनी १६ ऑक्टोबर, १९०५ साली लोकमत लक्षात न घेता बंगालची विभागणी केल्यामुळे स्वदेशी चळवळीला विशेष चालना मिळाली. परदेशी वस्तू वापरल्यामुळे आपल्या राष्ट्रातील संपत्ती बाहेर जाते, त्यामुळे आपले उद्योगधंदे बुडतात, त्यासाठी देशी वस्तू वापरून आपल्या उद्योग-धंद्याला चालना मिळावी एवढाच सुरुवातीला स्वदेशी चळवळीचा हेतू होता. वंगभंगाच्या चळवळीचा परिणाम म्हणून बंगालच्या लोकांनी देशामध्ये उत्पन्न होणाराच माल घ्यायचा असा निश्चय केला. स्वदेशी ही संकल्पना तशी नवीन नव्हती. लोक हितवादी (गोपाळ हरी देशमुख) स्वामी दयानंद, भोलानाथ चंद्र यांनी स्वदेशीचा पुरस्कार केलेला होता. मात्र स्वदेशीला नवीन अर्थ १९०५ ला प्राप्त झाला. कलकत्याच्या "संजीवनी" या साप्ताहिकाच्या १३ जुलै, १९०५ अंकात ब्रिटिश मालावर बहिष्कार ही कल्पना पहिल्यांदा सुचविण्यात आली." [१२] १७ जुलैला भागीरथ येथे आयोजित करण्यात आलेल्या सार्वजनिक सभेमध्ये ही कल्पना पहिल्यांदा स्वीकारण्यात आली. कलकत्याच्या टाऊन हॉलमध्ये ७ ऑगस्ट, १९०५ ला घेण्यात आलेल्या सभेसाठी विद्यार्थ्यांची संख्या ही १२,००० इतकी होती. या घटनेनंतर स्वदेशीचा प्रसार देशभर झाला.

स्वदेशी चळवळीला "आर्थिक" पाया होता. स्वदेशी चळवळीचे

चळवळीचे दोन हेतू होते, एक ब्रिटिशांवर दडपण आणणे आणि दुसरे भारतीय बाजारपेठांचा विकास करणे. मँचेस्टर येथे तयार होणाऱ्या कापडाला बंगालमधून कच्च्या मालाचा पुरवठा मोठ्या प्रमाणात होत होता. ब्रिटिश तयार कापड भारतामध्ये दरवर्षी पस्तीस-चाळीस कोटी इतका खपत असे. अन्य देशांतील व्यापाऱ्याचा फायदा व्हावा यासाठी देशातील मालावर सरकारकडून अवाजवी कर लावला जात असे. ही गोष्ट टिळकांना अन्यायकारक वाटत होती. "हिंदुस्थानचे राज्य हिंदुस्थानच्या कल्याणाकरिता चालावे, मँचेस्टरच्या नव्हे" हे लोकांना समजणे आवश्यक होते. महाराष्ट्रातील पूर्वीच्या स्वदेशीच्या घोषणेत राजकारण नव्हते. मात्र चालू स्वदेशीच्या चळवळीमध्ये राजकारणाचे अप्रत्यक्ष मिश्रण आहे असे टिळकांना वाटत होते. या जाणिवेनेच टिळकांनी ही चळवळ उचलून धरली. "टिळकांच्यापूर्वी रानडे, गोखले, दादाभाई नौरोजी यांनीही या प्रश्नावर विचार केला होता. परंतु या चळवळीस स्वातंत्र्य प्राप्तीचे प्रभावी साधन बनवले ते टिळकांनी" [१३] देशातील आर्थिक शोषणाचे सूत्र घेऊन भारताच्या आर्थिक अवनतीसंबंधी त्यांनी लेखन केले. त्यांच्या स्वदेशी व बहिष्कार या कार्यक्रमावरील लेखांमध्ये टिळकांनी देशातील सर्वसामान्य जनतेच्या पिळवणूकीला व दुःखाला वाचा फोडण्याचे काम केले. सर्वसामान्यांचे जीवनमान उन्नत झाल्याशिवाय कोणत्याही राष्ट्राची उन्नती झाली असे टिळक मानत नसत. "उपासमारीने त्रस्त असलेली जनता, आपल्या सर्व संकटाचे व दुःखाचे मूळ राज्यव्यवस्थेला मानते". म्हणून सरकारने अधिक खोलात जाऊन उपाय योजिले पाहिजे असे टिळकांचे मत होते. आर्थिक क्षेत्राचा देखील पारतंत्र्याइतकाच विचार झाला पाहिजे या जाणिवेतूनच टिळक या विषयांकडे वळले होते.

इंग्रज सरकारचे राज्य हिंदी लोकांच्या हितासाठी चालले आहे असे जरी राणीच्या जाहीरनाम्यात असले तरी प्रत्यक्ष स्थिती वेगळी होती. म्हणूनच जनतेच्या राज्यनिष्ठेच्या जुन्या समजुती बदलायला हव्यात असे टिळकांचे मत होते. न्याय करील तो राजा अशी समजूत जनतेची होणे आवश्यक आहे यावर त्यांचा भर होता. स्वदेशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देणे हा स्वदेशी चळवळीचा उद्देश होताच, पण त्याचबरोबर विलायती मालावर बहिःष्कार टाकण्यावरच सरकार गाऱ्हाण्याकडे लक्ष देईल हाही हेतू होता. १९०६ साली कलकत्ता येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनामध्ये राज्यकारभारावरसुध्दा बहिष्कार अशी व्याख्या करण्यात आलेली होती. स्वदेशी चळवळीसंबंधी विचार करताना राजकीय व सांपत्तिक दृष्टीने विचार केला पाहिजे या मताचे प्रतिपादन करताना टिळक सांगतात, "परदेशी मालाचा बहिष्कार घातल्याने देशी उद्योगधंद्यास आपोआप उत्तेजन मिळत असल्यामुळे बहिष्कारात सांपत्तिक स्थितीचाही विचार होतो. ही गोष्ट खरी आहे. पण विलायती मालास बहिष्कार घालण्याची जी बंगालच्या लोकांची प्रथम प्रवृत्ती झाली तिला मूळ कारण आजपर्यंतच्या आमच्या राजकीय मागण्याची राज्यकर्त्यांनी फेटाळणी केल्यामुळे लोकांची मते क्षुब्ध होऊन त्यांनी या बहिष्कार शस्त्राचा अंगिकार केला आहे. ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. म्हणजे "बहिष्कार" शब्दात नुसत्या सांपत्तिक गोष्टीचाच समावेश न होता राजकीय गोष्टीचांही समावेश होतो हे लक्षात ठेवून ही चळवळ चालविणाऱ्यांनी राजकीय दृष्टीने तिचा विचार केला पाहिजे." [१४] याचाच अर्थ असा होतो की, स्वदेशीमुळे परकीय वस्तुंचा वापर बंद होईल आणि त्यामुळे ब्रिटिशांना भारतीयांचे शोषण करता येणार नाही. आर्थिक नाडया बंद केल्याने ब्रिटिश आपोआपच दुबळा होईल. शिवाय स्वदेशीमुळे लोकांमध्ये सामाजिक सहकार्य वाढत जाईल.

ज्यांना दोन वेळच्या जेवणाचा प्रश्न आहे असे लोक इंग्रजी कपडे वापरणे शक्य नाही. त्यामुळे स्वदेशी चळवळीची मोठी जबाबदारी सुशिक्षित पांढरपेशा वर्गावर आहे, असे टिळकांना वाटत होते. सुशिक्षित पांढरपेशा लोकांनी ब्रिटिश कापड न वापरण्याचा निश्चय केला तर जनते-वरील अन्यायाचे परिमार्जन होणे शक्य होईल. त्यामुळे कोणतीही सबब न सांगता स्वदेशी कापड जनतेने वापरावे. त्यांच्यामध्ये स्वदेशीचे प्रेम उत्पन्न व्हावे म्हणून अनेक युक्तीवाद करण्यात आले. लग्नासारख्या मंगलकार्यात परदेशी वस्तूंची गर्दी झाली तर लग्नानंतर थोड्याच दिवसात वधू किंवा वर मरण पावले तर आश्चर्य कोणते ? असे प्रश्न उपस्थित करुन त्यांच्या भावनांना प्रोत्साहन देण्यात येत होते. टिळकांना देखील "स्वदेशी को-ऑपरेटीव्ह स्टोअर" नावाचे दुकान लोकांच्या अडचणी दूर करण्यासाठी काढले होते. गिरणीचे कापड गि-हाईकांना स्वस्त पडावे म्हणून दिनशा वाच्छा (१९०५) मुंबईत भेटून याच्यामार्फत गिरणी मालकांशी विचार-विनिमय टिळकांनी केला मात्र टिळकांची सूचना अमान्य करण्यात आली.

सर्वांनीच स्वदेशी कपडे वापरणे शक्य होणार नाही. या बाजूने युक्तीवाद करताना टीकाकारांनी असा मुद्दा उपस्थित केलेला होता, सर्वां-नीच देशी कापड वापरण्याचा निश्चय केला तर, इतक्या मोठ्या प्रमाणात लांब धाग्याचा पुरेसा कापूस या देशात नसल्यामुळे देशी कापड पुरणार नाही या टीकेला उत्तर देताना टिळक म्हणतात, "म्हणून देशी कापड वापर-ण्याची चळवळ करु नये हे म्हणणे असंमजसपणाचे आहे. हाच न्याय दुसरीकडे लागू केला तर कोणत्याही औद्योगिक राजकीय, सामाजिक चळवळी उद्याच्या उद्या सिध्दी नसल्यामुळे बंद ठेवाव्या लागतील." टिळकांच्या मते स्वदेशी चळवळीचे महत्त्व आणि उपयुक्तता अनेक दिशांनी आहे. स्वदेशीमुळे देशी औद्योगिकरणास चालना मिळून, खेडेगावातील लहान उद्योगांना चालना मिळून

शेतीवरील भार कमी होईल आणि वारंवार येणाऱ्या दुष्काळावर मात करता येईल. स्वदेशी चळवळ सुरुवातीला गैरसोयीची असली तरी पुढील प्रगतीच्या दृष्टीने जनतेने चळवळ स्वीकारली पाहिजे. परदेशी मालापैकी जो जास्त माल हिंदुस्थानात येतो त्या मालाची देशी बाजारपेठ आधी सुधारली पाहिजे. 'कापडाप्रमाणेच, साखर, तेल, यंत्रे इत्यादी वस्तूही परदेशातून हिंदुस्थानात येत असल्यामुळे याही धंद्याची सुधारणा केली पाहिजे.' असे टिळकांचे मत होते. ही सुधारणा करताना देशी मालाच्या वखारी, शास्त्रीय शिक्षण व संघशक्तीने भांडवलाची उभारणी इत्यादी स्वदेशी चळवळ जोरात चालण्याची जी साधने आहेत त्याचाही अंगिकार जनतेने करणे आवश्यक आहे यावर टिळकांनी भर दिला.

बहिष्कार

'स्वदेशी व बहिष्कार' हे दोन्ही मार्ग आर्थिक विचारसरणीवर आधारलेले होते. मात्र टिळकांनी राजकीय चळवळीचे साधन म्हणून स्वदेशी व "बहिष्कार एकच असे आहे हे स्पष्ट करतांना टिळक म्हणतात, 'स्वदेशी' आणि 'बहिष्कार' हे वेगवेगळे खरे तरी स्वकीयांना उत्तेजन देणे आणि नावडत्या परकीयांना बहिष्कार घालणे या गोष्टी स्वरूपत:च इतक्या सरमिसळ आहेत की, त्या वेगळ्या करणे शक्य नाही. 'वाणी' आणि 'अर्थ' ही जशी एकमेकांपासून वेगळी करता येत नाहीत तोच प्रकार 'स्वदेशी' आणि 'बहिष्कार' यांचा आहे." [१५] बहिष्कार हे राजकीय अस्त्र आहे असे म्हणत असताना त्यामध्ये ब्रिटिशांना शेतसारा वसूल करताना युध्दात सहकार्य, न्यायप्रशासनात मदत केली जाणार नाही, असा अर्थ अभिप्रेत होता. लो. टिळकांचे राजकीय आंदोलन जहाल स्वरूपाचे होते. हिंदुस्थानातील जनतेने कितीही सनदशीर मार्गाने आपली गाऱ्हाणी राज्य-

12995 A

कर्त्यांपुढे मांडली तरी उपयोग होत नव्हता. लोकमताची पायमल्ली ही केली जात होती. त्यासाठी अधिक तीव्र उपाय योजण्याची आवश्यकता होती. जे लोक आमचे ऐकत नाहीत निदान व्यापारात तरी त्यांना आम्ही नाकारले पाहिजे, यासाठी विलायती मालावर बहिष्कार घातला पाहिजे, असे टिळकांना वाटत होते. भारतीय जनतेजवळ शस्त्र आणि ऐक्याचा अभाव असल्यामुळे बहिष्काराचे शस्त्र प्रभावी ठरु शकेल,अशी टिळकांची खात्री होती. बहिष्कार हा राज्यकर्त्यांच्या विरुद्ध बंड नसून त्यांना देशातील दारिद्र्य, उपासमार, उद्योगधंद्याची खालावलेली स्थिती या गोष्टीची जाणीव व्हावी व जबाबदारीने कार्य करण्याची इच्छा व्हावी यासाठी स्वीकारलेला मार्ग आहे. भारतीयांच्या सहकार्यानेच इंग्रज लोक एवढया दूर येऊन राज्य करत आहेत, इंग्रजाना मदत न केल्यास त्यांना शासन करणे कसे कठीण जाईल हे सांगताना टिळक चीन आणि संयुक्त संस्थानाचे उदाहरण देत असत. अमेरिकेच्या मालावर चीनने बहिष्कार टाकला होता. म्हणूनच ब्रिटिश राज्यकर्त्यांपुढे विनवणीबरोबर बहिष्काराची जोड देऊन आपला हेतू साध्य केला पाहिजे.

पुण्यात सार्वजनिक सभेच्या नव्या दिवाणखाण्यात स्वदेशी बहिष्काराच्या सभांना सुरुवात झाली होती. २२ ऑगस्ट १९०६ रोजी सार्वजनिक सभेत टिळकांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांची सभा झाली. या सभेत देशी कापड वापरण्याची शपथ घेण्याचे ठरले. परदेशी कापडाची होळीच केली पाहिजे असे टिळकांचे मत नव्हते. मात्र शिवराम महादेव परांजपे यांच्या पुढाकाराने कलकत्त्याप्रमाणेच पुण्यातही परदेशी कापडाची होळी करण्यात आली. बहिष्काराची कल्पना केवळ पोशाखापुरती मर्यादित राहणे शक्य नव्हते म्हणून टिळकांनी "राष्ट्रीय बहिष्कार" हे नाव दिले. बंगालबरोबरच इतरत्र सार्वजनिक राजकीय असे बहिष्काराचे

स्वरूप प्राप्त झालेले होते. स्वदेशीची चळवळ सुरु झाल्यावर "केसरी" या वृत्तपत्रासाठी विलायती कागद का वापरता असा प्रश्न एका गृहस्थाने उपस्थित केला. टिळकांनी या प्रश्नाला पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले. गवताचा कागद पुण्याच्या गिरणीत होत नाही, मराठा पत्राला कागद थोडा लागतो पण केसरीला पुण्याच्या गिरणीतील कागद पुरेसा होत नाही म्हणून केसरीसाठी लागणारा कागद हा विलायतेमधून (ब्रिटन) न आणता जर्मनी, ऑस्ट्रीया, नार्वे, स्वीडन इथून आणला जातो. याचा अर्थ असा देशी माल पुरेसा तयार होत नाही हे खरे असले तरी प्रामुख्याने त्यांना विलायती मालावर बहिष्कार घालायचा होता हे स्पष्ट होते.

राष्ट्रीय शिक्षण

स्वराज्याचे पहिले साधन म्हणजे राष्ट्रीय शिक्षण, असे टिळक मानत असत. टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाविषयीच्या आपल्या कल्पना वेळोवेळी मांडल्या. केवळ पुस्तकी शिक्षणक्रम किंवा शिकवणारे माध्यम तयार करणे एवढेच मर्यादित राष्ट्रीय शिक्षणाने न राहता ते राष्ट्र-निर्मितीला सहाय्यभूत ठरले पाहिजे. "प्रत्येक स्वतंत्र देशातील सरकार आपल्या प्रजेस जे शिक्षण देते किंवा देऊ इच्छिते ते राष्ट्रीयच असते. देशातील तरुण पिढी देशाचे राजकीय, औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास किंवा वाढविण्यास समर्थ होईल, अशाप्रकारे त्यास शिक्षण देणे हे या देशांतील विद्याखात्याचे कर्तव्य आहे. आणि त्यासच "राष्ट्रीय शिक्षण" असे म्हणतात." [१६] टिळकांनी शिक्षणपध्दतीकडे राष्ट्र-बांधणीच्या दृष्टीने पाहिले होते. राष्ट्र निर्मितीसाठी लागणारे सांस्कृतिक प्रबोधन, राष्ट्रजागृती आणि राजकीय कार्यकर्त्यांची निर्मिती हीच त्यांच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या तीन उद्दिष्टे होती.

राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेमागे लोकमत उभे करणे आणि त्याचबरोबर शैक्षणिक क्षेत्रात सरकारने कोणते धोरण राबवावे ? अशा दोन्ही बाजूने टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाचा विचार केलेला आहे. त्याचबरोबर देशाचा अभिमान वाढणारे, धंदे शिक्षण देणारे, संशोधनाची दिशा दाखवणारे, लोकांना स्वत:च्या हक्काची जाणीव करून देणारे राजकीय शिक्षण अशा चार-पाच बाजूने टिळकांचे शिक्षण-विषय विचार स्पष्ट होतात.

टिळकांच्या जीवनकार्याची सुरुवात शिक्षणक्षेत्रापासून झाली. "न्यू इंग्लिश स्कूल"ची स्थापना करून आपल्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्यास सुरुवात केली. तत्कालीन देशस्थितीची जाणीव आपल्या देश-बांधवामध्ये निर्माण करण्यासाठी शिक्षणापासून प्रारंभ केला पाहिजे ही टिळक व त्यांचे सहकारी यांची धारणा होती. टिळक "केसरी" चे संपादक झाल्यावर राष्ट्रीय शिक्षणविषयक जे विचार व्यक्त केले त्यांचा मुख्य रोख सरकारच्या शिक्षणपद्धतीने राष्ट्र नि:सत्व, ध्येयशून्य व सत्त्वहीन कसे होत आहे यावर होता.

कारकून किंवा दुय्यम अधिकारी निर्माण करण्यासाठी शिक्षण देत आहेत हे सांगून लोकांचे लोकमत मिळवण्याचा प्रयत्न टिळकांनी केला. टिळकांची भाषणे व लेख एका बाजूला लोकांसाठी व दुसऱ्या बाजूला सरकारसाठी असत. लोकांनी काय करावे यासाठी मार्गदर्शन आणि सरकारचे काय कर्तव्य आहे याची चर्चा केलेली असते. स्वतंत्र देशात राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न उद्भवत नाही, परंतु पारतंत्र्यात असणाऱ्या देशात शिक्षण हे कमी महत्वाचे मानले जाते.

हिंदुस्थान हा शेतकीप्रधान देश आहे हे लक्षात घेऊन व्यवसायिक शिक्षण व कृषीशिक्षणाची जोड शिक्षणामध्ये दिली पाहिजे. भारताच्या औद्योगिकीकरणासाठी जपानचा आदर्श पुढे ठेवून तरूणांना तंत्रशिक्षण दिले पाहिजे. तंत्रशिक्षणासाठी त्यांना परदेशात पाठवून आवश्यक त्या सवलती दिल्या पाहिजेत यावर टिळकांचा भर होता. विद्यापीठातून शिक्षण घेऊन बाहेर पडणारी पिढी देशाच्या भवितव्याचा स्वतंत्रपणे विचार करतील आणि ते राजकीयदृष्टया अनिष्ट आहे असे वाटून सरकारने विद्यापीठे आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला. विद्यापीठे ही "सरकारी हमालखाने" बनली असून, विद्यापीठ हे विद्यामंदीर नसून परीक्षा घेण्याकरिता रजिस्टर्ड झालेली कंपनी आहे. असे टिळकांनी आपले मत विद्यापीठाच्या शिक्षणावर व्यक्त केलेले आहे. विद्यार्थ्यांना राष्ट्र सेवेसाठी प्रवृत्त करावे हा टिळकांचा राष्ट्रीय शिक्षणामागील हेतू होता. ब्रिटिश शिक्षणपध्दतीतून नोकरी मिळणारे शिक्षण मिळाले की तरूणांना स्वदेशाची किंमत काय कळणार ? असा प्रश्न टिळकांनी उपस्थित केला.

२१ मार्च, १९०८ ला पुणे जिल्हा सभेच्या बैठकीत राष्ट्रीय शिक्षणासंबंधीचा ठराव मांडण्यात आला. हा ठराव मांडताना टिळक म्हणाले, "राजकीय नाही राष्ट्रीय, ज्याने राष्ट्राकरिता मी वेळ आल्यास मरेन अशी बुध्दी उत्पन्न होईल असे राष्ट्रीय शिक्षण दिले गेले पाहिजे. सरकारच्या मुठीत आपले शिक्षण नको, इंग्रजी राज्यात स्वतंत्रपणाच्या कल्पना ते येऊ देणार नाहीत. हर एक बाबतीत आपला गळा दुसऱ्यांच्या ताब्यात नको. या गोष्टीचा आता आम्हाला वीट आला आहे. आम्हाला स्वतंत्र राष्ट्रात आहेत असल्या शाळा स्थापावयाच्या आहेत."[१७] सरकारी शिक्षणातील उपयुक्त शिक्षणाच्या अभावाचा दोष काढण्या-

साठी केवळ कारभारावर अवलंबून न राहता स्वतंत्र शाळा व स्वतंत्र परीक्षा पूर्व बंगालमध्ये सुरू झालेल्या होत्या. या पध्दतीचा पुरस्कार टिळकांनी केला. राष्ट्रीय शिक्षण संस्था निर्माण करून स्वावलंबनाचे आणि राष्ट्रीय वृत्तीचे शिक्षण दिले पाहिजे, असे टिळकांचे मत होते. सक्तीच्या शिक्षणासाठी लोकमताचा सरकारवर दबाव आणला पाहिजे असे ते म्हणत. राष्ट्रीय चळवळीच्या व्यापकतेबरोबर टिळकांचे शिक्षणविषय विचार बदलत होते.

टिळकांच्या जीवनकार्याचे उद्दिष्ट स्वराज्याचा हक्क मिळविणे हे होते. हा हक्क मिळविण्याची राष्ट्रीय जाणीव करून देणारे साधन म्हणून शिक्षणाचा त्यांनी विचार केला. प्रांतिक सभेमध्ये राष्ट्रीय शिक्षणासाठी लोकांनी शाळा काढणे आवश्यक आहे असा ठराव करून मंजूर केला. कॉंग्रेसमध्ये असा ठराव त्याआधी मंजूर झालेला होता. टिळकांनी सांगितलेल्या राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार गांधी युगामध्ये अधिक प्रभावी झालेला दिसतो.

## लोकमान्य टिळकांची राष्ट्रवादाची कल्पना

देशामध्ये 'राष्ट्रवाद' आणि 'लोकशाही' या विचारसरणीचे बीजारोपण करून न्या. रानडे आणि दादाभाई नौरोजी यांनी राष्ट्रवादाचा पाया रचला. आज लोकमान्यांनी, भारताची राष्ट्र म्हणून पूनर्स्थापना करण्याच्या एकमेव उद्दिष्टाने राष्ट्रवादाचे विचार सामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले. पुण्यात एकसष्टीनिमित्त झालेल्या सत्काराला उत्तर देताना टिळकांनी सांगितले, "आज आपणा सर्वांपुढे जे राष्ट्रकार्य आहे ते इतके मोठे, इतके व्यापक आणि इतके जरूरीचे आहे की,

त्याला आपणा सर्वांनी माझ्यापेक्षा किती तरी पट निश्चयाने आणि स्फूर्तीने लागले पाहिजे. आपली मातृभूमी आपणा सर्वांस या उद्योगास लागण्याबद्दल आवाहन करीत आहे. माझे कर्तव्य म्हणून मी आपणास शेवटची विनंती करीत आहे की, मातृभूमीच्या या आवाहनामुळे लक्ष देऊन कोणताही भेदभाव मनात न ठेवता आपण सर्व राष्ट्रदेव होऊ या." [१८] असे एकात्म, एकजीव झालेले राष्ट्र त्यांना अभिप्रेत होते. त्यासाठी जनता एका विचारातून संघटित होणे आवश्यक होते. म्हणूनच राष्ट्रवादी विचारातून लोकांना राजकीयदृष्टया जागृत करण्यासाठी त्यांनी धर्म आणि संस्कृतीचा आधार घेतला, कोणत्याही लोकांमध्ये ऐक्याची भावना वाढीला लावण्यासाठी असलेल्या अनेक साधनापैकी एक साधन म्हणजे उपास्य दैवत होय, असे त्यांना वाटत होते. त्यातूनच त्यांनी "गणेशोत्सव" हा उत्सव १८९३ पासून पुण्यात सुरु केला. हिंदू धर्माचे लोक गणपतीची पूजा घरोघरी करतात. त्या गणपतीची पूजा सार्वजनिक केल्यास लोकांमध्ये एकत्र काम करण्याची वृत्ती वाढीला लागावी हा उद्देश गणेशोत्सव साजरा करण्याच्या मागे होता. उत्सवाच्या पहिल्या दोन-तीन वर्षांत जुन्या परंपरेची आठवण "केसरी" या वृत्तपत्रामधून करुन दिली जात असे. गणेशोत्सव हा नवा नाही. तो जुनाच आहे हे सरकार आणि जनतेला टिळकांनी सांगितले. गणेशोत्सव ही मोहरमची नक्कल असून जुन्याच गोष्टींना नावारुपाला आणण्याचा प्रयत्न केलेला आहे, असे स्पष्टीकरण टिळकांनी दिले. हिंदु-मुसलमान यांच्यातील तंटे जर मिटवायचे असेल तर दोन्ही लोकांचे सणवार व्यवस्थितपणे पार पाडण्यास एकमेकांनी एकमेकांना मदत केली पाहिजे. थोडक्यात धर्माचा आदर करुन एकजुटीने समाजात राहिले पाहिजे यावर टिळकांचा भर होता.

टिळक नेहमीच हिंदुत्वाचा विचार करत असत. भारतातील राष्ट्रकल्पना, हिंदुराष्ट्रापासून सुरु झालेली असून वेदांताचे तत्त्वज्ञान या संकल्पनेत

आहे, असे त्यांना वाटत होते. टिळकांची विचारसरणी मुख्यत: हिंदु धर्मातील वेदांती परंपरेवर आधारलेली होती. धर्म व संस्कृती यातील चांगल्या गोष्टीचा उपयोग करुन राष्ट्रीयत्वाची भावना जोपासता येईल, यासाठी त्यांनी गणेशोत्सवाबरोबरच "शिवाजी उत्सव" सुरु केला. स्वराज्याची पुनर्स्थापना करुन राष्ट्रीय भावना दृढ करणाऱ्या शिवाजी महाराजांचे स्मरण करण्यासाठी टिळकांनी शिवाजी उत्सव १५ एप्रिल, १८९६ पासून सुरु केला. शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे किंवा हिंदुचे नसून ते राष्ट्रीय ऐक्याचे प्रतिक आहेत, राष्ट्रातील महापुरुषाचे स्मरण हे राष्ट्रीयत्व कायम राखण्यास एक चांगले साधन आहे असे त्यांचे मत होते. १८९५ मध्ये टिळकांनी, शिवाजी महाराजांच्या रायगडावरील समाधीच्या जीर्णोद्धाराची चळवळ सुरु केली. त्यासाठी देणगी जमा करण्यात आली. केसरीतून देणाऱ्यांची पोच देण्यात येऊ लागली. टिळकांनी चालविलेल्या चळवळीमुळे शिवस्मारकाचा विचार सर्व थरांतील लोकांनी आस्थेने करायला सुरुवात केली. परिणामत: देणाऱ्यांचा आकडा हा सहा महिन्यांमध्ये नऊ हजारापर्यंत गेला. रायगडावरील उत्सवामुळे महाराष्ट्रामध्ये शिवाजी उत्सव साजरे करण्यात येऊ लागले. २८ एप्रिल, १८९६ च्या केसरीच्या अंकात "शिवजयंतीचा राष्ट्रीय उत्सव" या मथळ्याने अग्रलेख प्रसिध्द झाला.

भारतामध्ये ख्रिस्तीधर्माच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी वैदिक संस्कृतीचे श्रेष्ठत्व सांगण्यासाठी चळवळी सुरु झाल्या. यामध्ये राजाराम-मोहन रॉय, स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद, विष्णुबुवा ब्रम्हचारी यांनी प्रबोधनाचे कार्य सुरु केले. ब्राम्होसमाज, आर्यसमाज आणि प्रार्थना-समाज या चळवळीचे कार्य निधर्मी नव्हते. धर्मामध्ये परिवर्तन झाल्याशिवाय भारताच्या राष्ट्रीय एकतेला बळकटी येणार नाही या विचारातूनच राष्ट्र-वादाला संस्कृतीचे स्वरुप देण्यात येत होते. मात्र टीकाकारांनी त्यांच्यावर

प्रांतिकतेचा आरोप केला असला तरी, प्रांतिकतेतून राष्ट्रपातळीवर संघटित-पणा असा राष्ट्रवाद त्यांना अभिप्रेत होता. त्यांच्या मते, प्रांतिक भावना हे व्यापक राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचे साधन आहे. हिंदु-मुस्लीम यांच्यामध्ये दरी वाढवण्याचे काम टिळकांनी केले अशीही टीका त्यांच्यावर केली जाते. मात्र हिंदुस्थान ही सर्वांची मातृभूमी असल्यामुळे सर्वांनीच सारखीच खटपट केली पाहिजे, असे टिळकांचे मत होते. "हिंदुस्थानातील मुसलमान लोक अरबस्थानातून किंवा मध्य एशियामधून इकडे आलेल्या मुसलमानाचे वंशज असोत अथवा येथल्या हिंदुचे मुसलमान झालेले असोत, कसेही असले तरी हिंदुस्थान ही आता सर्वांचीच जन्मभूमी झालेली आहे व या जन्म-भूमीच्या भाग्योदयासाठी सर्वांनी एकसारखीच खटपट केली पाहिजे."[१९] यातून भारतीयांनी जाती-भेदाचा विचार न करता राष्ट्रवाद, आणि मातृभूमीच्या निष्ठांचाच विचार केला पाहिजे. हिंदु-मुस्लीम यांच्यामध्ये फूट पाडण्याचे इंग्रजांचे कार्य एकराष्ट्रीयत्वाला धोका देणारे आहे, असे टिळकांना वाटत होते. राष्ट्रीय प्रवाहात सहभागी होण्यासाठी मुसलमानांनी हिंदुसंबंधीचे आपले गैरसमज दूर केले पाहिजेत.

ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढा देण्यासाठी टिळकांना 'ऐक्य' महत्त्वाचे वाटत होते. वेदान्ताची ओळख मुसलमानांनी करुन घेतल्यास हिंदु-मुस्लीम दुजाभाव राहणार नाही, दोन्ही धर्मांच्या लोकांनी धर्मस्वातंत्र्य, सह-अस्तित्व, सहयोग, परस्पर सामंजस्य, मातृभूमीशी निष्ठा इत्यादीतूनच राष्ट्रीय प्रवाहात सहभागी झाले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. भारत ही आपली मातृभूमी आहे, या भावनीय आधारावर, टिळकांना मुसलमानांना नव्या राष्ट्रीय प्रवाहात सामावून घ्यायचे होते. पण त्याचबरोबर जनतेमध्ये केवळ देशप्रेम असून चालत नाही तर त्यांच्यामध्ये ऐक्याची, आत्मियतेची भावना

असली पाहिजे. १९१६ च्या लखनौ अधिवेशनामध्ये हिंदु-मुस्लीम करार हा "लखनौ" करार म्हणून ओळखला जातो. हा समेट होईपर्यंत टिळक हिंदु-मुस्लीमांच्या प्रश्नाचा पाठपुरावा करत होते. टिळकांनी हिंदु-मुस्लीम संबंधांचा तीन बाजूनी विचार केलेला आहे. त्यामध्ये हिंदु-मुस्लीम दंगे, त्यांच्यातील सामाजिक संघर्ष, इंग्राज सरकार व मुसलमान यांच्यातील संबंध अशा तीन बाजूने टिळकांनी या प्रश्नाचा विचार केलेला आहे. समान राजकीय हक्कासाठी एकत्र येण्यासाठी "राष्ट्रीय सभा" साधन आहे. म्हणूनच त्यांनी हिंदु-मुस्लीमामध्ये सलोख्याची भावना निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले. पण त्यासाठी हिंदुप्रमाणे मुसलमानातही परधर्म सहिष्णुता येणे आवश्यक आहे असेही त्यांना वाटत होते. आंदोलनामध्ये सर्वांनाच सामावून घेण्याचा प्रयत्न करून राष्ट्रीय चळवळ लोकाभिमुख केली.

राष्ट्रीयत्वाच्या भावनेमध्ये देशप्रेम हे गृहीतच असले पाहिजे असे टिळकांचे मत होते. टिळकांनी स्वराज्यासाठी राष्ट्रवादाचा पाया घातला राष्ट्रभक्ती हा टिळकांच्या राजकीय विचारांचा केन्द्रबिंदू आहे. त्यासाठी त्यांनी स्वदेश व स्वसंस्कृतीना महत्वाचे साधन मानले. लखनौ अधिवेशनामध्ये टिळक म्हणाले, "ब्रिटिशांच्या मतानुसार आर्य हे येथील मूळ वंशज नसून आदि द्रविड हे मूळचे रहिवाशी आहेत. आर्यांकडून मुस्लिमांनी, मुस्लिमांकडून इंग्राजानी हा प्रदेश जिंकला. इंग्राज हे हिंदुस्थानचे रक्षक असून त्यांनी आपली सत्ता आदि द्रविडांच्या हातात देऊन निघून जावे. आम्ही या मूळ मालकांची सेवा करायला आनंदाने तयार आहोत." [२०] इतिहास व परंपरा, धर्म व तत्वज्ञान, कृती व ऐक्य या सर्वांना टिळकांनी देशप्रेमाच्या संकल्पनेतून अर्थपूर्ण केले.

टिळकांची स्वराज्य चळवळ ही "राष्ट्रवादा"वर आधारित होती. सर्वसामान्य व्यक्तीचा या चळवळीमध्ये समावेश करून चळवळीला व्यापक रूप दिले. कायद्याच्या कक्षेतच राहून त्यांना स्वराज्य पाहिजे होते. ब्रिटिश राज्याच्या अंतर्गतच देशी प्रतिनिधीच्या हाती पूर्ण कारभार पाहिजे यावर त्यांनी मुख्यत: भर दिला. स्वराज्याबरोबरच स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण या साधनाचा वापर करून टिळकांनी राष्ट्रवादाची भावना जनतेमध्ये रूजवण्याचे कार्य केले. भारताची राष्ट्र म्हणून पुनर्स्थापना करण्याच्या एकमेव उद्दिष्टाने राष्ट्रवादाचे विचार सामान्य लोकांपर्यंत पोहचवले. या मुख्य कार्यापुढे त्यांनी सामाजिक सुधारणाना दुय्यम स्थान दिल्याचे स्पष्ट होते.

......

## संदर्भ सूची


१. इनामदार, एन्.आर. - पॉलिटीकल्स थॉट ॲन्ड लिडरशिप ऑफ लोकमान्य, प्रकाशन पब्लिकेशन्स कंपनी, नवी दिल्ली, प्रथमावृत्ती १९८३, पृ.क्र.

२. वर्मा, व्ही.पी. - दि लाईफ ॲन्ड फिलॉसॉफी ऑफ लोकमान्य टिळक, प्रकाशन महेन्द्रा जैन आगरा-३, प्रथमावृत्ती - १९६८, पृ.क्र. ४४१.

३. पाटील, बी.बी. - भारतीय राजकीय विचार, प्रकाशक - जे.शाह सी जमनादास ॲन्ड कंपनी, मुंबई, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट, १९७९, पृ.क्र. ६०.

४. केळकर, भा.कृ. - टिळक विचार, श्रीविद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे-३०, प्रथमावृत्ती-१९८१, पृ.क्र. १९४.

५. इनामदार एन्.आर. - उपरोक्त, पृ.क्र. ४.

६. समग्र लोकमान्य टिळक, खंड-७, प्रकाशक - ज.श्री. टिळक, केसरी मुद्रणालय, नारायण पेठ, पुणे-३०, प्रथमावृत्ती १९७६, पृ.क्र. ६०१.

७. तळवलकर गोविंद - बाळ गंगाधर टिळक, प्रकाशन मॅजिस्टिक बुक स्टॉल, मुंबई-४, दुसरी आवृत्ती - १९८०.

८. समग्र लोकमान्य टिळक, खंड-४, प्रकाशक-ज.श्री. टिळक, केसरी मुद्रणालय, नारायण पेठ, पुणे-३०, प्रथमावृत्ती-१९७६, पृ.क्र. ७८.

९. फाटक, न.र. - लोकमान्य, मौज प्रकाशन, मुंबई-४.

१०. फडके, य.दी. - विसाव्या शतकातील महाराष्ट्र-राजकीय इतिहास, १९१४ ते १९२०, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती-१९८९, पृ.क्र.६९.

११. केळकर, न.चि. - लोकमान्य टिळक यांचे चरित्र, प्रकाशक- न.चि.केळकर, शनिवार पेठ, पुणे, प्रथमावृत्ती-१९२३, पृ.क्र.१९९.

१२. मजुमदार,के.सी. - स्ट्रॅगल ऑफ फ्रिडम, प्रकाशक-भारत विद्या भवन, दुसरी आवृत्ती-१९८८, पृ.क्र. २७.

१३. शिंदे,ज.रा. - भारतीय राजकीय विचार, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती-१९८१, पृ.क्र. ८७.

१४. कुलकर्णी,आप्पाजी विष्णू - लो.टिळक यांची गेली आठ वर्षे, प्रकाशक- इंदुप्रकाश स्टीम प्रेस, मुंबई, प्रथमावृत्ती-१९०९, पृ.क्र. ३४८.

१५. केळकर, न.चि. - उपरोक्त, पृ.क्र. ६४.

१६. केळकर, भा.कृ. - उपरोक्त, पृ.क्र. ६१.

१७. केळकर, भा.कृ. - उपरोक्त, पृ.क्र. ६२.

१८. केळकर, भा.कृ. - उपरोक्त, पृ.क्र. १३.

१९. समग्र लोकमान्य टिळक खंड-५, प्रकाशक - ज.श्री. टिळक, केसरी मुद्रणालय, नारायण पेठ-३०, प्रथमावृत्ती - १९७६, पृ.क्र. ४५३.

२०. धनंजय किर - लोकमान्य टिळक फॉदर ऑफ अवर फ्रिडम स्ट्रगल, प्रकाशक - एस्.बी.कांगुटकर,बागेश्वर भवन, लेडी हार्डिंग रोड, मुंबई-१६, प्रथमावृत्ती-१९५९, पृ.क्र.११५.

.....